Reg. No. NP CITY/236/2018-20.

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

प्राधिकृत प्रकाशन

वर्ष ९, अंक १८] गुरुवार ते बुधवार, मे ४-१०, २०२३/वैशाख १४-२०, शके १९४५ [पृष्ठे ९, किंमत : रुपये ३०.००

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी प्रत्येक विभागाच्या पुरवणीला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग एक—नागपूर विभागीय पुरवणी

अनुक्रमणिका


| | पृष्ठे |
|---|---|
| **भाग एक-शासकीय अधिसूचना** : नेमणुका, पदोन्नती, अनुपस्थितीची रजा (भाग एक-अ, चार–अ, चार-ब व चार–क, यांमध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ नागपूर विभागाशी संबंधित असलेले नियम व आदेश. | १-१. |
| **संकीर्ण अधिसूचना** : नेमणुका इ. इ., केवळ नागपूर विभागाशी संबंधित असलेले नियम व आदेश. | २-९ |
| **भाग एक-अ.**—(भाग चार-ब यामध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ नागपूर विभागाशी संबंधित असलेले महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपालिका बरो, जिल्हा नगरपालिका, प्राथमिक शिक्षण व स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम याअन्वये काढण्यात आलेले आदेश व अधिसूचना. | १-५ |


## शासकीय अधिसूचना : नेमणुका, इत्यादी

भाग १ (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ५८७.

LAW AND JUDICIARY DEPARTMENT

Mantralaya, Mumbai-400 032, Dated 11th April 2023.

*NOTIFICATION*

No. SPP-2020-U.O.R. 35-D-XIV :—

In view of the recommendation received from Home Department, the Government of Maharashtra hereby cancels the appointment of Adv. Ajay Suhas Misar for conducting the cases arising out of C.R. No. 420-2019 registered at New Kamathi Police Station, Dist. Nagpur made *vide* Law and Judiciary Department, Government Notification No. SPP-2020-U.O.R. 35-D-XIV, dated 10th November, 2022 with immediate effect.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

VAISHALI P. BORUDE,
Section Officer.

# संकीर्ण अधिसूचना : नेमणुका, इत्यादी

भाग १ (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ५८८.

## जिल्हाधिकारी, यांजकडून

**भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३, कलम १९ (१) अन्वये.**

क्रमांक कलि-विभूअ-लसिंका-कावि-६६-२०२३.––

ज्याअर्थी, समुचित शासन असलेल्या वर्धा जिल्ह्याच्या जिल्हाधिका-याने भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) (यात यापुढे ज्याचा निर्देश " उक्त अधिनियम " असा केला आहे) याच्या कलम ११ च्या पोट-कलम (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, अधिसूचना कलम ११ (१) राजपत्र ५ ते ११ जानेवारी २०२३ अन्वये पान क्रमांक ०२ ते ०३ वर प्रारंभिक अधिसूचना काढली आहे आणि त्याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, यासोबत जोडलेल्या अनुसूची-एकमध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या जमिनीची, अनुसूची-दोनमध्ये अधिक तपशीलवार विनिर्दिष्ट केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे किंवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे ;

आणि ज्याअर्थी, वर्धा जिल्ह्याच्या जिल्हाधिका-याने कलम १५ च्या पोट-कलम (२) अन्वये दिलेला अहवाल, कोणताही असल्यास, विचारात घेतल्यानंतर, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमीन संपादित करण्याची आवश्यकता आहे, याबाबत त्यांची खात्री पटली आहे ;

आणि म्हणून, उक्त अधिनियमाच्या कलम १९ च्या पोट-कलम (१) च्या तरतुदीन्वये उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिनीची आवश्यकता आहे, असे याद्वारे घोषित करण्यात येत आहे;

आणि ज्याअर्थी, अनुसूची-तीनमध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेले क्षेत्र हे बाधित कुटुंबियाच्या पुनर्वसन व पुनर्वसाहतीच्या प्रयोजनासाठी " पुनर्वसाहत क्षेत्र " म्हणून निर्धारित केले असल्याचे याद्वारे घोषित केले जात असून, पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश अनुसूची-चारमध्ये विनिर्दिष्ट केला आहे;

आणि म्हणून, त्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये, समुचित शासन असलेल्या जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमान्वये जिल्हाधिका-यांची कार्ये पार पाडण्यासाठी उपजिल्हाधिकारी (भूसंपादन), लघु सिंचन कामे, वर्धा यास पदनिर्देशित करीत आहे.

### अनुसूची-एक

### जमिनीचे वर्णन

भूसंपादन प्रकरण क्रमांक ०७-एलएक्यु-४७-२०२१-२०२२, मौजा देवळी, तहसील देवळी, जिल्हा वर्धा

| अनुक्रमांक | भूमापन किंवा गट क्रमांक | | संपादनाखालील क्षेत्र (अदमासे) |
|---|---|---|---|
| (१) | (२) | | (३) हे. आर |
| १ | २३७ | | ० ३६ |
| २ | २३८ | | ० ५१ |
| | एकूण संपादन क्षेत्र | . . | ० ८७ |

### अनुसूची-दोन

### सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाबाबत विवरण

| | | |
|---|---|---|
| प्रकल्पाचे नाव | :— | निम्न वर्धा कालवे प्रकल्प. |
| सिंचन योजना प्रकल्प कार्याचे वर्णन | :— | निम्न वर्धा प्रकल्प देवळी लघु कालवा व त्यावरील उपलघु कालव्याचे बांधकामाकरिता. |
| समाजाला मिळणारे लाभ (आर्थिक याबाबत व इतर लाभासंदर्भात) | :— | सामाजिक कल्याण साधण्याकरीता देवळी लघु कालवा व उपलघु कालव्याचे बांधकामामुळे त्या परिसरातील जमीन गठित पाण्याचा स्त्रोत वाढविण्यास सोयी सुविधा यांचा लाभ परिसरातील जमीन कास्तकारांना होणार आहे. |

**अनुसूची-तीन**

**पुनर्वसाहत क्षेत्राचे वर्णन**

-निरंक-

**अनुसूची-चार**

**पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश**

-निरंक-

**टीप-** उक्त जमिनीच्या आराखड्याचे भूसंपादित जमिनीचा नकाशा उपजिल्हाधिकारी (भूसंपादन), लघु सिंचन कामे, वर्धा यांचे कार्यालयामध्ये निरीक्षण करता येईल.

---

भाग १ (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ५८९.

**भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३, कलम १९ (१) अन्वये.**

क्रमांक कलि-विभूअ-लसिंका-कावि-६७-२०२३.––

ज्याअर्थी, समुचित शासन असलेल्या वर्धा जिल्ह्याच्या जिल्हाधिका-याने भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) (यात यापुढे ज्याचा निर्देश " उक्त अधिनियम " असा केला आहे) याच्या कलम ११ च्या पोट-कलम (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, अधिसूचना कलम ११ (१) राजपत्र दिनांक १७ ते २३ डिसेंबर २०२२ अन्वये पान क्रमांक ०१ ते ०७ वर प्रारंभिक अधिसूचना काढली आहे आणि त्याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, यासोबत जोडलेल्या अनुसूची-एकमध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या जमिनीची अनुसूची-दोनमध्ये अधिक तपशीलवार विनिर्दिष्ट केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे किंवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे ;

आणि ज्याअर्थी, वर्धा जिल्ह्याच्या जिल्हाधिका-याने कलम १५ च्या पोट-कलम (२) अन्वये दिलेला अहवाल, कोणताही असल्यास, विचारात घेतल्यानंतर, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमीन संपादित करण्याची आवश्यकता आहे, याबाबत त्यांची खात्री पटली आहे ;

आणि म्हणून, उक्त अधिनियमाच्या कलम १९ च्या पोट-कलम (१) च्या तरतुदीन्वये उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिनीची आवश्यकता आहे असे याद्वारे घोषित करण्यात येत आहे;

आणि ज्याअर्थी, अनुसूची-तीनमध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेले क्षेत्र हे बाधित कुटुंबियाच्या पुनर्वसन व पुनर्वसाहतीच्या प्रयोजनासाठी " पुनर्वसाहत क्षेत्र " म्हणून निर्धारित केले असल्याचे याद्वारे घोषित केले जात असून, पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश अनुसूची-चारमध्ये विनिर्दिष्ट केला आहे;

आणि म्हणून, त्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये, समुचित शासन असलेल्या जिल्हाधिकारी, उक्त अधिनियामान्वये जिल्हाधिका-यांची कार्ये पार पाडण्यासाठी उपजिल्हाधिकारी (भूसंपादन), लघु सिंचन कामे, वर्धा यास पदनिर्देशित करीत आहे.

**अनुसूची-एक**

**जमिनीचे वर्णन**

भूसंपादन प्रकरण क्रमांक २७-एलएक्यु-४७-२०२१-२०२२, मौजा देवळी, तहसील देवळी, जिल्हा वर्धा.

| अनुक्रमांक | भूमापन किंवा गट क्रमांक | संपादनाखालील क्षेत्र (अदमासे) |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| | | हे. आर |
| १ | ३१७ | ० ५३ |
| | एकूण संपादन क्षेत्र .. | ० ५३ |

**अनुसूची-दोन**

**सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाबाबत विवरण**

| | | |
|---|---|---|
| प्रकल्पाचे नाव | :— | जिल्हा व सत्र न्यायालय, वर्धा. |
| सिंचन योजना प्रकल्प कार्याचे वर्णन | :— | न्यायालयीन इमारत विकास योजना देवळी (सुधारित वाढीव क्षेत्र) न्यायालयीन इमारत व निवासस्थानाकरिता. |
| समाजाला मिळणारे लाभ (आर्थिक याबाबत व इतर लाभासंदर्भात) | :— | देवळी सुधारित विकास योजनेमध्ये आरक्षित करण्यात आलेल्या सर्व्हे क्र. ३१७ वरील आरक्षण क्र. ३ मधील न्यायालयीन इमारत आणि निवास बांधकामाकरीता. |

**अनुसूची-तीन**

**पुनर्वसाहत क्षेत्राचे वर्णन**

-निरंक-

**अनुसूची-चार**

**पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश**

-निरंक-

**टीप-** उक्त जमिनीच्या आराखड्याचे भूसंपादित जमिनीचा नकाशा उपजिल्हाधिकारी (भूसंपादन), लघु सिंचन कामे, वर्धा यांचे कार्यालयामध्ये निरीक्षण करता येईल.

वर्धा :
दिनांक २९ मार्च २०२३.

**राहुल कर्डिले,**
जिल्हाधिकारी, वर्धा.

---

भाग १ (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ५९०.

**महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम १२६ (२) व भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३, कलम १९ (१) अन्वये.**

क्रमांक अका-उविअ-कावि-५४५-२०२३.—

ज्याअर्थी, भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) याच्या कलम ३ च्या खंड (इ) च्या परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून काढण्यात आलेली अधिसूचना, महसूल व वन विभाग क्रमांक संकीर्ण ११-२०१४-प्र.क्र. ७७-अ-२, दिनांक १९ जानेवारी, २०१५ (यात यापुढे जिचा निर्देश "उक्त अधिसूचना" असा करण्यात आला आहे.) याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (झेड-अे) मध्ये व्याख्या केलेल्या एखाद्या सार्वजनिक प्रयोजनासाठी, एखाद्या जिल्ह्यातील ५०० हेक्टरपेक्षा अधिक नसेल इतक्या क्षेत्राकरिता जमीन संपादन करण्याच्या संबंधात, अशा जिल्ह्याचा जिल्हाधिकारी हा उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी समुचित शासन असल्याचे मानण्यात येईल;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिसूचनेनुसार समुचित शासन असलेल्या वर्धा जिल्ह्याच्या जिल्हाधिका-यास यासोबत जोडलेल्या अनुसूची-एकमध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेली जमीन (यात यापुढे जिचा निर्देश "उक्त जमीन" असा करण्यात आला आहे) सार्वजनिक प्रयोजनासाठी (यात यापुढे ज्याचा निर्देश "उक्त सार्वजनिक प्रयोजन" असा करण्यात आला आहे) आवश्यक आहे अथवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आह, असे वाटते, ज्याच्या स्वरूपाचे विवरण यासोबत जोडलेल्या अनुसूची-दोनमध्ये दिलेले आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त जमिनीच्या जमीन मालकाने महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ४९ अन्वये खरेदी सुचना बजाविली आहे व सदर खरेदी सूचना महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ४९(४) अन्वये कायम करण्यात आली आहे;

आणि म्हणून, उक्त अधिनियमाच्या कलम १९ च्या पोट-कलम (१) च्या तरतुदीन्वये याद्वारे असे अधिसूचित करण्यात येते की, उक्त जमिनीची उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता भासण्याची शक्यता आहे;

आणि ज्याअर्थी, सदर्हु प्रस्तावित भूमि संपादनाच्या अनुषंगाने बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे, यासोबत जोडलेल्या अनुसूची-तीन मध्ये दिलेली आहेत. (विस्थापन होणार असेल तर या अनुसूचीमध्ये कारणे नमूद करावी) ;

आणि ज्याअर्थी, सामाजिक परिणाम निर्धारण सारांश यासोबत जोडलेल्या अनुसूची-चार मध्ये दिलेला आहे;

आणि ज्याअर्थी, कलम ४३ च्या पोट-कलम (१) अन्वये पुनर्वसन व पुनर्वसाहत या प्रयोजनासाठी नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील, यासोबत जोडलेल्या अनुसूची-पाचमध्ये दिलेला आहे. (नियुक्ती करणे आवश्यक असेल तर या अनुसूचीमध्ये तपशील नमूद करावा);

त्याअर्थी, आता, असे घोषित करण्यात येत आहे की, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम १२६ (१) व उक्त अधिनियमाच्या कलम १९ च्या पोट-कलम (४) अनुसार कोणतीही व्यक्ती, ही अधिसूचना प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून ते उक्त अधिनियमाच्या प्रकरण चार खालील कार्यवाही पूर्ण होईल त्या कालावधीपर्यंत उक्त जमिनीचा अथवा तिच्या भागाचा कोणताही व्यवहार करणार नाही किंवा उक्त जमिनीवर कोणताही भार निर्माण करणार नाही.

परंतु आणखी जसे की, जर कोणत्याही व्यक्तीने या तरतुदीचे बुद्धीपुरःस्सर उल्लंघन केल्यामुळे तिला झालेल्या कोणत्याही हानीची किंवा क्षतीची जिल्हाधिका-यांकडून भरपाई दिली जाणार नाही.

आणि म्हणून, त्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये, समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमाखालील जिल्हाधिका-यांची कार्ये पार पाडण्यासाठी उपविभागीय अधिकारी तथा विशेष भूसंपादन अधिकारी, वर्धा यास पदनिर्देशित करीत आहे.

## अनुसूची-एक

## जमिनीचे वर्णन

भूसंपादन प्रकरण क्रमांक ०१-एलएक्यु-४७-२०२०-२०२१, मौजा सिंदी रेल्वे, तालुका सेलू, जिल्हा वर्धा.

| अनुक्रमांक | भूमापन किंवा गट क्रमांक | संपादनाखालील क्षेत्र |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| | | चौ. मि. |
| १ | १६ | ७३१३.२५ |
| | एकूण . . | ७३१३.२५ |

## अनुसूची-दोन

## सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाबाबत विवरण

| | | |
|---|---|---|
| प्रकल्पाचे नांव | :— | मौजा सिंदी रेल्वे येथे क्रिडांगण. |
| योजना प्रकल्प कार्याचे वर्णन | :— | सिंदी रेल्वे येथील विकास आराखडा अंतर्गत क्रिडांगणाकरीता. |
| समाजाला मिळणारे लाभ (आर्थिक, रोजगार, पायाभूत सुविधा, सोयीसुविधा याबाबत व इतर लाभासंबंधात). | :— | या विकास आराखडा अंतर्गत क्रिडांगणाचा उपयोग सार्वजनिक प्रयोजनाकरिता पायाभूत सुविधा, सोयीसविधा याबाबत व इतर उपलब्ध होणार असून त्यांच्या जिवनमानात सुधारणा होणार आहे. |

## अनुसूची-तीन

## बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे

बाधीत व्यक्तींचे विस्थापन करण्याची आवश्यकता नाही.

## अनुसूची-चार

| | | |
|---|---|---|
| सामाजिक प्रभाव निर्धारणाचा सारांश (सामाजिक प्रभाव निर्धारण अभ्यास करणा-या अभिकरणाने दिलेला) | :— | महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ४९ च्या खरेदी सूचनेनुसार कलम १२६ (२) अन्वये आरक्षण क्र. २८ चे भूमि संपादन. |

## अनुसूची-पाच

## नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील

| | | |
|---|---|---|
| (अ) प्रशासक म्हणून नियुक्त करण्यात आलेल्या अधिका-याचे पदनाम | :— | -निरंक- |
| (ब) प्रशासकाच्या कार्यालयाचा पत्ता | :— | -निरंक- |
| (क) ज्या अधिसूचनेद्वारे प्रशासकाची नियुक्ती करण्यात आली आहे, त्या अधिसूचनेचा तपशील विस्तृत विवरण (निर्गमित करण्यापूर्वी भरावे) | :— | -निरंक- |

ना.-एक-२ (१५२३).

**विशेष नोंद** :— उक्त जमिनीच्या आराखड्याचे भूसंपादित जमिनीचा नकाशा उपविभागीय अधिकारी तथा विशेष भूसंपादन अधिकारी, वर्धा यांचे कार्यालयामध्ये निरीक्षण करता येईल.

वर्धा :
दिनांक १२ एप्रिल २०२३.

**नरेंद्र फुलझेले,**
जिल्हाधिकारी, वर्धा.

---

भाग १ (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ५९१.

**भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३.**

क्रमांक अका-प्रस्तु ३-भुसंपादन-कावि-३८०-२०२३.—

ज्याअर्थी, समुचित शासन असलेल्या भंडारा जिल्ह्याच्या जिल्हाधिका-याने भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) (यात यापुढे ज्याचा निर्देश " उक्त अधिनियम " असा केला आहे) यांच्या कलम ११ च्या पोट-कलम (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, अधिसूचना क्रमांक १०७८, दिनांक २१ जून २०२२ अन्वये प्रारंभिक अधिसूचना काढली आहे आणि त्याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, यासोबत जोडलेल्या अनुसूची-एकमध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या जमिनीची अनुसूची-दोनमध्ये अधिक तपशीलवार विनिर्दिष्ट केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे किंवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे ;

आणि ज्याअर्थी, भंडारा जिल्ह्याच्या जिल्हाधिका-याने कलम १५ च्या पोट-कलम (२) अन्वये दिलेला अहवाल, कोणताही असल्यास, विचारात घेतल्यानंतर, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमीन संपादित करण्याची आवश्यकता आहे याबाबत त्यांची खात्री पटली आहे ;

आणि म्हणून, उक्त अधिनियमाच्या कलम १९ च्या पोट-कलम (१) च्या तरतुदीन्वये उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिनीची आवश्यकता आहे असे याद्वारे घोषित करण्यात येत आहे.

आणि ज्याअर्थी, अनुसूची-तीनमध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेले क्षेत्र हे बाधित कुटुंबियांच्या पुनर्वसन व पुनर्वसाहतीच्या प्रयोजनासाठी " पुनर्वसाहत क्षेत्र " म्हणून निर्धारित केले असल्याचे याद्वारे घोषित केले जात असून, पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश अनुसूची-चार मध्ये विनिर्दिष्ट केला आहे.

आणि म्हणून, त्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये, समुचित शासन असलेल्या जिल्हाधिकारी, उक्त अधिनियामान्वये जिल्हाधिका-यांची कार्ये पार पाडण्यासाठी उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी, साकोली यांना पदनिर्देशित करीत आहे.

**अनुसूची-एक**

**संपादित करावयाच्या जमिनीचे वर्णन**

भूसंपादन प्रकरण क्रमांक ०४-एलक्युएन-२०२०-२०२१, गावाचे नाव महालगांव, तालुका साकोली, जिल्हा भंडारा

| अनुक्रमांक | भूमापन क्र. किंवा गट नंबर | संपादनाखालील क्षेत्र |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| | | हे. आर मी. |
| १ | ५९३ | ०.०२ |
| २ | ६०५ | ०.००.५० |
| ३ | ६४७/१ | ०.०३ |
| | एकूण . . | ०.०५.५० |

**अनुसूची-दोन**

**सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाबाबत विवरण**

प्रकल्पाचे नाव :— निम्न चुलबंद प्रकल्प.

प्रकल्पाचे वर्णन :— निम्न चुलबंद प्रकल्पाच्या डावा कालवा करिता लागणा-या खाजगी जमिनीचे मौजा महालगांव येथील संपादनाकरीता.

| | |
|---|---|
| समाजाला मिळणारे लाभ (आर्थिक रोजगार, पायाभुत सुविधा याबाबत) व इतर लाभासंबंधत) :— | निम्न चुलबंद प्रकल्पाद्वारे सिंचन, पिण्यासाठी पाणी पुरवठा, औद्योगिक पाणी पुरवठा, मत्स्य व्यवसाय व जलविद्युत निर्मिती |

**अनुसूची–तीन**

**बाधीत व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे**

विस्थापीत होत नाही.

**अनुसूची–चार**

**पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश**

-निरंक-

**टीप-** उक्त जमिनीच्या आराखड्याचे अभिलेख उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी, साकोली यांचे कार्यालयामध्ये निरीक्षण करता येईल.

भंडारा :
दिनांक २१ एप्रिल २०२३.

**योगेश कुंभेजकर,**
जिल्हाधिकारी, भंडारा.

---

भाग १ (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ५९२.

## जिल्हादंडाधिकारी, यांजकडून

**वाचा :-**(१) कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग (विशेष प्रकल्प), नागपूर यांचे पत्र जा. पत्र क्र. बांवि (विप्र)-५५७५-२०२२, दिनांक २३ डिसेंबर २०२२ प्राप्त दिनांक २६ डिसेंबर २०२२.

(२) कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग (विशेष प्रकल्प), नागपूर यांचे पत्र जा. पत्र क्र. बांवि (विप्र)-३४३-२०२३, दिनांक २३ जानेवारी २०२३ प्राप्त दिनांक २५ जानेवारी २०२३.

(३) या कार्यालयाचे आदेश क्र. अजिदं-गृह-अ. का.-२-कावि-६५-२०२२, दि. ३ फेब्रुवारी २०२२.

**(कामठी घोरपड लिहीगाव रस्त्यावर असलेल्या कामठी गावाजवळ रेल्वे क्रासींग वर ROB च्या बांधकामाकरीता मार्गावरील वाहतूक इतर मार्गाकडे वळती करण्याबाबत.)**

**अधिसूचना**

क्रमांक अजिदं-गृह-अ. का.-२-अधिसूचना-कावि-९८-२०२३.—

ज्याअर्थी, कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग (विशेष प्रकल्प), नागपूर यांनी खालील नमूद केल्याप्रमाणे व प्रस्तावित केल्यानुसार माझे असे निदर्शनास आले आहे की, घोरपड लिहीगाव, तह. कामठी, जि. नागपूर हद्दीतील—

नागपूर येथून कामठी घोरपड लिहीगाव रस्त्यावर कामठी गावा जवळ जयस्तंभ चौक ते रविदास नगर येरखेडा रस्त्यावर प्रजिमा-३४ असलेल्या तालुका कामठी जवळ रेल्वे क्रासींगवर ५६४/३ टी वर रेल्वे ओवर ब्रीज (ROB) चे बांधकाम कार्यकारी अभियंता, बाधकाम विभाग (विशेष प्रकल्प), नागपूर यांचे मार्फत करण्यात येत असून सदर काम पूर्ण करण्याचा कालावधी दिनांक ३१ डिसेंबर २०२२ पर्यंत आदेशित करण्यात आलेले होते. परंतु, मार्च २०२० पासून कोवीड-१९ च्या प्रादुर्भावामुळे काम पूर्णपणे बंद करण्यात आले व सदर कामामध्ये Utility shifting (Pipe line व Electric Pole, Cables etc.) चे काम करणे गरजेचे असल्यामुळे त्याची निविदा करणे व काम करण्यास विलंब झाल्यामुळे या कार्यालयाद्वारे पारित करण्यात आलेल्या अधिसूचनेच्या कालावधीत काम पूर्ण होऊ शकले नाही.

त्यामुळे (ROB) चे बांधकाम करत असतांना घोरपड ड्रॅगन पॅलेस ते राष्ट्रीय महामार्ग क्र. ७ ते नागपूर जबलपूर मार्गावर वाहतूक वळती करणे आवश्यक आहे.

सदर रेल्वे ओवर ब्रीज (ROB) चे बांधकाम करत असतांना घोरपड ड्रॅगन पॅलेस ते राष्ट्रीय महामार्ग क्र. ७ ते नागपूर जबलपूर मार्गावर वाहतूक वळती करता येईल. वळण मार्ग दर्शविणारे फलक विभागाद्वारे योग्य ठिकाणी लावण्यात येईल.

तसेच, संदर्भिय पत्र क्र. (१) व (२) अन्वये कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग (विशेष प्रकल्प), नागपूर यांनी नमूद मार्गावरील रस्त्याचे वाहतूक इतर मार्गाकडे वळती करणेबाबत नवीन अधिसूचना जारी करण्यास विनंती केली आहे.

त्याअर्थी, कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग (विशेष प्रकल्प), नागपूर यांनी प्रस्तावित केल्याप्रमाणे सदर रस्त्याचे वाहतूक इतर मार्गाकडे वळती करण्यास परवानगी शासन नियमात दिलेल्या कोणत्याही नियम, अटी व शर्तीचा भंग होणार नाही या आधारावर देण्यात येत असून उक्त अधिसूचनेस याद्वारे दिनांक ३१ डिसेंबर २०२३ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे.

ही अधिसूचना आज दिनांक ११ एप्रिल २०२३ रोजी माझ्या स्वाक्षरी व शिक्क्यासह प्रसिद्ध करण्यात येत आहे.

नागपूर :
दिनांक ११ एप्रिल २०२३.

**डॉ. विपीन,**
जिल्हादंडाधिकारी, नागपूर.

---

भाग १ (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ५९३.

## जिल्हा अधीक्षक, भूमि अभिलेख, यांजकडून

**वाचा** :-(१) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण-२०१८-प्र. क्र. १३- मातंक, मुंबई, दिनांक २२ फेब्रुवारी २०१९.

(२) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक चौविया-२०१५-प्र. क्र. २६- वित्त-४-मंत्रालय, मुंबई, दिनांक ३० ऑगस्ट २०१९.

(३) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक चौविया-२०१५-प्र. क्र. २६- वित्त-४-मंत्रालय, मुंबई, दिनांक ३१ ऑगस्ट २०१९.

(४) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक चौविया-२०१९-प्र. क्र. १३६- वित्त-४-मंत्रालय, मुंबई, दिनांक ३१ ऑगस्ट २०१९.

(५) मा. जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख (म. राज्य), पुणे यांचे कडील अधिसूचना क्रमांक एस. व्ही. एस. आर. ४३२३-स-४-९४, दिनांक २२ सप्टेंबर १९९४.

(६) मा. जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख (म. राज्य), पुणे यांचे कडील परिपत्रक क्र. गावठाण-ड्रोन सर्व्हे-प्र. क्र. ३९-२०२१, दिनांक २५ जानेवारी २०२१.

**संदर्भ**– उप अधीक्षक, भूमि अभिलेख, सेलू यांचे कडील पत्र क्र. मौ. कोटोंबा-परिरक्षण प्रस्ताव-२०२३, दिनांक २८ फेब्रुवारी २०२३ प्राप्त दिनांक ३ मार्च २०२३.

### अधिसूचना

क्रमांक ड्रोन सर्व्हे-गावठाण-अधिसूचना-मौजा कोटोंबा-जा. क्र. १९९१-२०२३.—

महाराष्ट्र शासन, महसुल व वन विभागाकडील निर्णय क्रमांक १०९३-प्र. क्र. १९-ल-१-दिनांक १८ ऑगस्ट १९९४ चे शासन निर्णयानुसार भूमि अभिलेख विभागाची तालुका स्तरावर पुनर्रचना करण्यात आलेली आहे. त्या अनुषंगाने या कार्यालयाकडील अधिसूचना क्र.-एसव्हीसीआर-४३२३-स-४-९४, दिनांक २२ सप्टेंबर १९९४ अन्वये नागपूर विभागातील सजांची पुनर्रचना करणेत आली असून सजांची गावे व मिळकती कायम करणेत आलेल्या आहेत.

स्वामित्व योजने अंतर्गत ड्रोनद्वारे गावठाण भूमापन झालेल्या मौजा कोटोंबा, ता. सेलू, जि. वर्धा या गावाचे गावठाण भूमापनाचे काम पूर्ण झाल्यामुळे उप अधीक्षक, भूमि अभिलेख, सेलू यांचे अधिनस्त साजा सेलू मध्ये कोटोंबा हे गाव नव्याने समाविष्ट करून त्यांचे कार्यक्षेत्रात बदल करणेत येवून परिरक्षणास घेणेस एतद्वारे मंजुरी देणेत येत आहे.

### परिशिष्ट

**नगर भूमापन योजनेअंतर्गत नव्याने परिरक्षणासाठी घेणेत येणा-या गावांचा/मिळकतीचा तपशील**

| अ. क्र. | जिल्हा | तालुका | कार्यालयाचे नाव | सध्या परिरक्षणासाठी उपलब्ध (पुनर्रचनेपूर्वी) | | | परिरक्षणास नव्याने घ्यावयाची | | पुनर्रचनेनंतरची स्थिती | | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | साजा | गावे | मिळकती | गावे | मिळकती | साजा | गावे | मिळकती | |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) | (१२) | (१३) |
| १ | वर्धा | सेलू | उप अधीक्षक, भूमि अभिलेख, सेलू | सेलू | सेलू | ९७८ | कोटोंबा | २७६ | सेलू | सेलू | ९७८ | |

**परिशिष्ट**—चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) | (१२) | (१३) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | घोराड | ८०२ | | | | घोराड | ८०२ | |
| | | | | | हिंगणी | ८६० | | | | हिंगणी | ८६० | |
| | | | | | येळी | ५९९ | | | | येळी | ५९९ | |
| | | | | | केळझर | ७०० | | | | केळझर | ७०० | |
| | | | | | दहेगाव गो. | ५४४ | | | | दहेगाव गो. | ५४४ | |
| | | | | | सिंदी रे. | ३७०६ | | | | सिंदी रे. | ३७०६ | |
| | | | | | रेहकी | ५६२ | | | | रेहकी | ५६२ | |
| | | | | | झडशी | ५५६ | | | | झडशी | ५५६ | |
| | | | | | वाहीतपुर | १४५ | | | | वाहीतपुर | १४५ | |
| | | | | | गायमुख | ७८ | | | | गायमुख | ७८ | |
| | | | | | शिवनगाव | ७२ | | | | शिवनगाव | ७२ | |
| | | | | | कोलगाव | ६७ | | | | कोलगाव | ६७ | |
| | | | | | चिंचोली | ६० | | | | चिंचोली | ६० | |
| | | | | | देऊळगाव | ४४ | | | | देऊळगाव | ४४ | |
| | | | | | धोंडगाव | १५ | | | | धोंडगाव | १५ | |
| | | | | | गोंदापूर | ६१ | | | | गोंदापूर | ६१ | |
| | | | | | मोर्चापूर | ६४ | | | | मोर्चापूर | ६४ | |
| | | | | | उत्तमपूर | १४ | | | | उत्तमपूर | १४ | |
| | | | | | हेलोडी | १३० | | | | हेलोडी | १३० | |
| | | | | | रिधोरा | ९९ | | | | रिधोरा | ९९ | |
| | | | | | आलगाव | ७७ | | | | आलगाव | ७७ | |
| | | | | | बोंडसुला | १३८ | | | | बोंडसुला | १३८ | |
| | | | | | गरमसुर | ९४ | | | | गरमसुर | ९४ | |
| | | | | | रायपुर ज. | ९५ | | | | रायपुर ज. | ९५ | |
| | | | | | वडगाव ज. | १७५ | | | | वडगाव ज. | १७५ | |
| | | | | | तुळजापूर | ७३ | | | | तुळजापूर | ७३ | |
| | | | | | टाकळी किटे | ७२ | | | | टाकळी किटे | ७२ | |
| | | | | | सेलडोह | १९८ | | | | सेलडोह | १९८ | |
| | | | | | बोथली | ७६ | | | | बोथली | ७६ | |
| | | | | | वानोडा | १३६ | | | | वानोडा | १३६ | |
| | | | | | किन्ही | ६६ | | | | किन्ही | ६६ | |
| | | | | | येंकापुर | १०९ | | | | येंकापुर | १०९ | |
| | | | | | बाभुळगाव | ७५ | | | | बाभुळगाव | ७५ | |
| | | | | | वानरविहीरा | ६५ | | | | वानरविहीरा | ६५ | |
| | | | | | | | | | | कोटोंबा | २७६ | |
| | | | | एकूण | . . ३५ | ११,६०५ | १ | २७६ | | ३६ | ११,८८१ | |

–

सदर अधिसूचनेची अंमलबजावणी दिनांक ५ एप्रिल २०२३ पासून होणेची आहे व सदर गावची सनद फी रक्कम रू. १,५४,८५० ची त्वरीत वसुली करण्यात यावी.

वर्धा :
दिनांक ५ एप्रिल २०२३.

**प्रमोद ठुबे,**
जिल्हा अधीक्षक, भूमि अभिलेख,
वर्धा.

ना.-एक-३ (१५२३).

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT PRESS AND BOOK DEPOT, CIVIL LINES, NAGPUR-440 001 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI-400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.